①

अहवाल -

(भाग-2)

'गतशतकपत्रिका' - सेमिनार दि २५ सप्टेंबर २०१४

कमिटी रूम, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई.

प्रस्तावना - डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे.

नियतकालिकांमधून येणारा साहित्यविचार महत्त्वाचा. कलावंताचा औचित्यविवेक महत्त्वाचा असतो. कलावंताने अनावश्यक म्हणून रद्द केलेल्या गोष्टी समीक्षकांना दिसतात. कलाकृतीमध्ये पिवळत्याचा विचार नको. सत्य व सुंदराचा संबंध असेलच असे नाही. Participater आणि observer हा संबंध महत्त्वाचा. collective unconciousness दिपला की तो झिरपत, पाझरत कलाकृतीमध्ये येतो.

'प्रतिभा' - डॉ. वंदना आपटे.

'प्रतिभेचे' सुरुवातीचे अंक उपलब्ध नसल्यामुळे या नियतकालिकाच्या भूमिकेसंदर्भात निश्चित समजले नाही. 'प्रतिभेमधल्या' लेखांची मांडणी सैध्दांतिक पद्धतीने केली आहे. साहित्यसमीक्षेमध्ये सर्व साहित्यप्रकारांना वाव दिला आहे. समाजवादी समीक्षा, मार्क्सवादी समीक्षा तसेच कलावाद, जीवनवाद यांवरही बरीच चर्चा या नियतकालिकामधील लेखांमधून झाली आहे. पुस्तक परीक्षणामध्ये नाटकांचे सर्वाधिक परीक्षण झाले आहे. नाटकातील स्त्रीभूमिका स्त्रियांनीच कराव्यात या विचाराचे स्वागत काही लेखांमधून झाले आहे. विडंबन काव्यावरचे विचारही प्रकाशित झाले आहेत.

'रत्नाकर' - डॉ. मालती तेंडुलकर

हे नियतकालिक साधारण साडेसात वर्षे चालले. वाङ्मयातील श्लील-अश्लील, वाङ्मय व नीती, आस्वादप्रक्रिया इ. बाबत अभ्यासपूर्ण लेख 'रत्नाकर'ने छापले. यासंदर्भात ना. सी. फडके, ग. त्र्यं.

माडखोलकर यांचे विचार या नियतकालिकामधून आले. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी कला व नीती संदर्भात ~~लिहिताना~~ लिहिले आहे की, खरा कलावंत वाईट कृती निर्माण करत नाही. सौंदर्याची दृष्टी अंतिम मानावी. कथा व गुजगोष्टी हे 'रत्नाकर' चे वैशिष्ट्य. लघुकथेविषयी चर्चाही यात आली आहे.

'छंद' - ज्योती जोशी

'छंद' च्या अंकांना ऋतुंची नावे देण्यात आली. मुखपृष्ठ त्या-त्या ऋतुला साजेसे. ~~अन~~ इतर भाषांमधील साहित्यामध्ये काय नवीन आहे याची चर्चा तसेच ~~साहित्य~~ इतर ललित कलांविषयीची चर्चा ही 'छंद' मध्ये आली. मराठी शब्दांची यादीही अन्यान्य अंकांमध्ये छापून आली.

'ज्योत्स्ना' - ज्योती परब

'ज्योत्स्ना' मध्ये ललितलेखांना विशेष स्थान देण्यात आले. साहित्यिकांचा पत्रव्यवहार वाचनीय ठरला आहे.

'आलोचना' - डॉ. अरुणा दुभाषी

आलोचना हे साठोत्तरी काळातील नियतकालिक. दुसऱ्या महायुद्धामुळे निर्माण झालेली जागतिक परिस्थिती, स्वातंत्र्योत्तर काळात सुरुवातीच्या वर्षांमध्ये भारतीय समाजात वेगवेगळ्या स्तरांवर आलेली स्थित्यंतरे, पाश्चात्य देशांमधील तत्त्वज्ञानातील नवनवीन प्रवाह या सर्वांचा अपरिहार्य परिणाम मराठी साहित्यावर झाला. या परिवर्तनांच्या आणि नव्या प्रवाहांच्या संदर्भ आलोचना मासिकाला आहे. साहित्य, साहित्यविचार आणि समीक्षा- ~~पद्धती~~ या सर्व विषयांना स्पर्श करण्याचा प्रयत्न आलोचनेने केला. एखाद्या विषयाची स्वायत्तता निश्चित करणे म्हणजे त्या विषयाला मर्यादा घालणे नसून त्या विषयाचे स्वच्छ आकलन करून घेणे ही आलोचनेची दृष्टी आहे.

'युगवाणी' - डॉ. सुनील रामटेके.

युगवाणी - विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र. कलेच्या प्रयोजना विषयी असो की कलास्वादाविषयी किंवा कला व जीवनवादाविषयी; गंभीर असे चिंतन 'युगवाणी' मधून अभिव्यक्त झाले आहे.

साहित्यविचाराची सर्वात चिकित्सा 'युगवाणी' मध्ये झाली आहे. प्रत्यक्ष सौंदर्यानुभूती किंवा कलानुभूती, त्या अनुभूतीचे प्रकटीकरण, त्याचा आस्वाद या तीन घटकांमध्ये कायमची दरी राहणे अटळ आहे. यामुळेच कलेचे विषय जुने असले तरी त्यांचा आविष्कार सतत नवा वाटतो. तसेच, शोकनाट्यातून होणाऱ्या आनंदाचे स्वरूप कसे असते याचे विश्लेषण पाश्चिमात्य साहित्यविचारात कॅथार्सिसच्या सिद्धांताने कसे अधोरेखित केले आहे याबद्दलचे लेख 'युगवाणी' मध्ये प्रसिद्ध झाले. डॉ. यशवंत मनोहर यांचा ललित वाङ्मय कसे असावे या संदर्भातला लेख, व ना. ग. जोशी यांचा 'दलित साहित्य व दलित समाज एक प्रतिक्रिया' हा लेख तसेच डॉ. गिरीश गोपाळ देशपांडे यांचा 'विज्ञान आणि साहित्य' हा लेख असे अनेक लेख 'युगवाणी' तील साहित्यविचारामधल्या वैविध्याची माहिती आपल्याला देतात.

'महाराष्ट्र साहित्य पत्रिके' मधील साहित्यविचार -

- डॉ. अविनाश सांगोलेकर

एखाद्या वाङ्मयीन नियतकालिकांमध्ये प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष स्वरूपात व्यक्त झालेला साहित्यविचार हा एकूण साहित्यव्यवहाराला पूरक आणि पोषक ठरू शकतो, दिशा व वळण देऊ शकतो, तसेच गतीही देऊ शकतो. म्हणून तो जाणून घेणे साहित्यव्यवहाराच्या दृष्टीने आवश्यक ठरते.

मराठीतील साहित्यविचार हा संस्कृत साहित्यशास्त्राच्या आधारे करण्यात आलेला आहे तसेच इंग्रजीतील साहित्यविचार आत्मसात करून त्याचे मराठी रूपही अवतरले.

म. सा. प. मधील लेखांमधून साहित्यविचाराशी संबंधित अनेक छोट्यामोठ्या बाबींवर अधिकारी व्यक्तींनी प्रकाश टाकला.

'पुरोगामी वाङ्‌मयाची लक्षणे', 'कलावाद', 'वाङ्‌मयीन टीकेची उद्दिष्टे', 'भाषा आणि साहित्य', 'मर्ढेकर : साहित्यातील सौंदर्य', 'सामान्य भाषा, समीक्षा आणि मूल्यांकन' अशा अनेक लेखांमधून 'म. सा. प.' मध्ये साहित्यविचार व्यक्त झाला.

'अभिरुचीतील साहित्यविचार – डॉ. मृणालिनी कामत

वाङ्‌मयप्रकारांच्या नवतेची पायाभरणी 'अभिरुची' मधून झाली, त्यामुळे त्या वाङ्‌मयप्रकारांच्या आकृतिबंधाच्या (forms) निमित्ताने नवे विचार व चर्चा यांना 'अभिरुची' चे व्यासपीठ मिळाले. अनिल, मर्ढेकर, कुसुमावती देशपांडे, वा. ल. कुलकर्णी, रा. श्री. जोग, शरच्चंद्र मुक्तिबोध, दिनेश मालुलकर, गं. बि. राजाध्यक्ष अशा मराठीतील श्रेष्ठ विचारवंतांनी 'अभिरुचीतून आपली भूमिका मांडली.

शालेय टीका लेखनात उपयुक्त ठरतील अशी समीक्षात्मक शब्दांची 'संकेत निष्पत्ती' मर्ढेकरांनी सर्वप्रथम केली. त्यांचे हे महत्त्वाचे लेखन 'अभिरुचीतून आलेले आहे. आधुनिक मराठी समीक्षेची परिभाषा वा. ल. कुलकर्णी यांच्या ~~लेखनातून~~ लेखांमधून 'अभिरुची' च्या माध्यमातून प्रसिद्ध झाली.

जुन्या लेखकांबद्दल नव्याने शोध घेणे आणि नव्या लेखनातील सौंदर्यघटक शोधणे अशा दुहेरी स्वरूपाचे समीक्षालेखन 'अभिरुची' मधून प्रसिद्ध झाले. मराठी समीक्षेला संस्कृतनिष्ठ जुन्या पद्धतीतून बाहेर काढून आधुनिक आणि पाश्चिमात्य समीक्षेपर्यंत आणून ठेवण्याचे कार्य या नियतकालिकाने केले आहे.

'कवितारती' – डॉ. दीपा राजवर्धन

'कवितारती' ने काव्यविषयक विचार विविध लेखांमधून प्रसिद्ध केले. नव्या कविता, काव्यविषयक सैद्धांतिक लेख, आस्वाद, रसग्रहणे, परीक्षण यांमधून कवींच्या कवितांची रचनातत्त्वे, परिचय, कवींच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध आणि कवितेतून व्यक्त होणारा सामाजिक विचार, काव्यसमीक्षा असा नानाविध

विचारांचे सजग 'कवितारती' ने रसिकांना उघडे केले. कुसुमाग्रज, बा. भ. बोरकर, विजया राजाध्यक्ष यांच्यासारख्या साहित्यिकांचे काव्यविषयक लेख 'कवितारती' मधून प्रसिद्ध झाले.

## 'अनुष्टुभ' - राजश्री कुलकर्णी

साहित्याला वाहिलेली अनेक मासिके बंद पडल्याच्या काळात 'अनुष्टुभ' हे मासिक सुरू झाले. नवसमीक्षेची पाळेमुळे 'अनुष्टुभ' मुळे मराठी साहित्यात रुजली.

पु. शि. रेगे आणि गंगाधर पाटील यांनी आपल्या लेखनातून समग्राही साहित्यविचार मांडला. भा. ज. कविमंडन यांनी 'कविता : विशेषवती रचना' या शीर्षकांतर्गत लेखमाला लिहिली. 'अनुष्टुभ' मधून येणारा साहित्यविचार ~~साहित्यविचार~~ हा 'साहित्य आणि संस्कृती', 'साहित्यकृतीतील समाजचित्रण' 'अभिजाततावाद', 'सौंदर्यवाद', 'वास्तववाद' 'सौंदर्यानुभव' 'साहित्य : दलित आणि ग्रामीण' 'स्त्रीवादी समीक्षा' ~~'मानसशास्त्रीय'~~ अशा विविध लेखांमधून प्रसिद्ध झाला. विषयाला अनुसरून वेगवेगळे विशेषांकही 'अनुष्टुभ' ने छापले.

## 'सत्यकथा' - डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे

साहित्यविचाराबाबत अंतिम मत कोणालाच देता येत नाही. 'सत्यकथे' मधील कथेविषयी द. भि. कुलकर्णी व वा. ल. कुलकर्णी यांनी मौलिक विचार मांडले. असंख्य लेखक 'सत्यकथेच्या' पगड्यातून बाहेर पडलेले नाहीत.

रेगे, आरती प्रभू हे अतिवास्तववादी कवी असून यांचा शोध 'सत्यकथेच्या' समीक्षकांनी घ्यायला हवा होता. साहित्यकृतीच्या मुळाशी मानवी अस्तित्व असते. आशय आणि रूप यांची एकरूपता म्हणजे साहित्यकृती हे भान १९९० नंतर हरपलं म्हणून चांगल्या साहित्यकृतींची निर्मिती होऊ शकली नाही.

—→—